सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १, अंक १६] सोमवार, मे २५, २००९/ज्येष्ठ ४, शके १९३१ [ पृष्ठ ३
किंमत रुपये १८.००

असाधारण क्रमांक ५०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एफ, एक-अ आणि एफ-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सार्वजनिक आरोग्य विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मे २००९

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक मवैअ. १००७/४५८/प्र. क्र. ३७५/०७/सेवा-३.—भारताचे संविधान यांच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २००० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २००० (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम २ मध्ये–



5

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

(१) खंड (अ) वगळण्यात येईल, आणि

(२) खंड (ब), (क), (ड) आणि (इ) यांना अनुक्रमे खंड (अ), (ब), (क) आणि (ड) असे नवीन क्रमांक देण्यात येतील.

(३) अशा रीतीने नवीन क्रमांक दिलेल्या खंड (ड) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

" (इ) " निवड मंडळ " म्हणजे, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रुपये ८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील वैद्यकीय अधिकारी पदावर उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी शासनाने स्थापन केलेले मंडळ ".

३. मुख्य नियमांच्या नियम ३ मधील खंड (क) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये " आयोगाच्या " या मजकुराऐवजी " निवड मंडळाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये " आयोग " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्यांच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी त्याऐवजी " महाराष्ट्र लोकसेवा आयोग " हा मजकूर व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शर्वरी गोखले,

शासनाच्या अपर मुख्य सचिव.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st May 2009

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MMO. 1007/458/C.R. 375/07/SER-3.–In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra hereby makes the following rules, further to amend the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) Rules, 2000 namely :–

1. These Rules may be called the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) (Amendment) Rules, 2009.

2. In the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services Group-A (Recruitment) Rules, 2000 (hereinafter referred to as " the principal Rules "), in rule 2–

(1) clause (a) shall be deleted ; and

(2) clause (b), (c), (d) and (e) shall be re-named as clauses (a), (b), (c) and (d) respectively ;

(3) after clause (d) so re-named, the following clause shall be inserted, namely :---

"(e) "Selection Board" means the Board constituted by the Government for appointment of candidates to the post of Medical Officer, in pay scale of Rs. 8000-13,500 in the Maharashtra Medical and Health Services, Group-A."

3. In rule 3 of the principal Rules, in clause (c), in the second proviso, for the words " the Commission ", the words " the Selection Board " shall be substituted.

4. In rule 11 of the principal Rules, for the words " the Commission " used at both the places, the words " the Maharashtra Public Service Commission " shall be substitued.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHARWAREE GOKHALE,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner